


दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955

बीड – महाराष्ट्र । शुक्रवार दि. ०१ मे २०२६ । वर्ष ६ वे । अंक ४३ । पाने ४ । पान १ । किंमत ३ रूपये




RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://epaper.marathwadapatra.com | E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com




# डिग्री दहावीची, कृत्य हैवानाचे !

## निवृत्त न्यायाधीशाचं घर भाड्यानं घेतलं, १० वी पास दाम्पत्याचा गर्भपात धंदा, पोलिसांनी ठोकल्या बेड्या

छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

अवैध गर्भपाताच्या घटना आज ही होत आहेत. छत्रपती संभाजीनगर शहरातील रशिदपुरा भागात एक मोठ्या अवैध गर्भपात रॅकेटचा पर्दाफाश करण्यात आला आहे. पोलिसांनी मध्यरात्री धाड टाकत हा संपूर्ण प्रकरणाचा डाव उधळवून लावला. शहरातल्या 'खमर विला' या बंगल्यात हे काळे कृत्य



**तपासात या रॅकेटचे धागेदोरे सिडको एन–६ मधील 'बीटेल डायग्नोस्टिक पॅथलॅब' पर्यंत पोहोचले आहेत**

सुरू असल्याची माहिती पोलीसांना मिळाली होती. सिटी चौक पोलिसांनी महापालिका आरोग्य विभागाच्या मदतीने पहाटे २ च्या सुमारास ही कारवाई केली. या प्रकरणी पॅथलॅब चालकांसह ६ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

सिटी चौक पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक निर्मला परदेशी यांना रशिदपुरा येथील प्लॉट नंबर १६ वर अवैध गर्भपात होत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली होती. त्यांनी तातडीने मनपा आरोग्य अधिकारी डॉ. पारस मंडलेचा यांच्याशी संपर्क साधला. त्यानंतर संयुक्त पथक तयार केले. पहाटेच्या सुमारास टाकलेल्या या छाप्यात गर्भपातासाठी लागणारी घातक औषधे, वैद्यकीय साहित्य आणि बेकायदेशीर सोनोग्राफीसाठी वापरला जाणारा 'प्रोब' जप्त करण्यात आला आहे.

या रॅकेटचा क्रूर चेहरा तेव्हा समोर आला, जेव्हा एका पीडित महिलेची ▶▶ उर्वरित पान २ वर




# आज पासून बीड मध्ये कृषी प्रदर्शनाला सुरुवात

## आ. पंडिताच्या हस्ते होणार उद्घाटन ; पुरस्कार वितरणास कृषी मंत्री मंत्री भरणे, महंत शिवाजी महाराज, रजनी पाटील, ज्योती मेटेची उपस्थिती

बीड । प्रतिनिधी

मराठवाड्यातील शेतकर्यांना तंत्रज्ञानाची माहिती मिळावी या उद्देशाने गेल्या १८ वर्षांपासून किसान कृषि विकास प्रतिष्ठानच्या वतीने या प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. या वर्षी प्रथमच बीड येथे दिनांक ०१ ते ०५ मे दरम्यान किसान कृषी महोत्सव हे कृषि



प्रदर्शन संभाजी महाराज क्रीडांगण ( मल्टीपर्पज ग्राउंड )या मैदानात भव्य अशा ५ दिवसीय राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले आसल्याची माहिती आयोजन समितीचे मुख्य संयोजक महेश बेद्रे, स्वागताध्यक्ष दिलीप गोरे , कार्याध्यक्ष शिवराम घोडके , निमंत्रक सुभाष साळवे जिल्हा कृषी अधीक्षक,मुख्य संयोजक महेश बेद्रे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.आज मान्यवरच्या उपस्थितीत कृषी प्रदर्शनाचे सुरुवात होत आहे

मराठवाड्यातील शेतकर्यांना नवतंत्रज्ञान मिळावे म्हणून येथील किसान कृषी विकास प्रतिष्ठान च्या वतीने आयोजन केले असून प्रकल्प संचालक आत्मा, महाराष्ट्र शासन कृषी विभाग, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ ▶▶ उर्वरित पान २ वर

## आ.संदिप क्षीरसागरांनी घेतली पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांची भेट

मुंबई । प्रतिनिधी



बीड शहरातील नागरिकांना भेडसावरणारा पाणी टंचाईचा प्रश्न, बीड जिल्ह्यात नियोजीत असलेले रेशीम पार्क, बीड जिल्हा ▶▶ उर्वरित पान २ वर







# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात डॉ.थोरात यांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश

## केज मतदार संघासह बीड जिल्ह्यात शिवसेनेची जोरदार मोर्चा बांधणी

बीड । प्रतिनिधी

केज विधानसभा मतदारसंघात शिवसेनेच्या संघटनात्मक बळात लक्षणीय वाढ झाली असून डॉ. प्रतिभाताई अशोकराव थोरात यांनी उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे प्रमुख नेते एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत जाहीर प्रवेश करत भगवा हाती घेतला. या प्रसंगी मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांनीही



त्यांच्यासह शिवसेनेत प्रवेश केला. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा प्रवेश महत्त्वाचा मानला जात आहे. मुंबई येथे डॉ.थोरात यांचा पक्षप्रवेश कार्यक्रम झाला. ▶▶ उर्वरित पान २ वर

**एकनाथ शिंदे यांचे बीड जिल्ह्यावर विशेष लक्ष– उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात शिवसेनेने राज्यभर संघटनात्मक विस्ताराला वेग दिला आहे. विशेषत: बीड जिल्ह्यावर त्यांनी लक्ष केंद्रीत केल्याने पक्षात मोठ्या प्रमाणावर प्रवेश सुरू आहेत. कार्यकर्त्यांपासून ते स्थानिक पातळीवरील प्रभावी नेत्यांपर्यंत अनेकजण शिवसेनेकडे आकर्षित होत आहेत. येत्या काळातही जिल्ह्यातील अनेक दिग्गज नेते व कार्यकर्ते शिवसेनेत प्रवेश करणार असल्याने जिल्ह्यात शिवसेनेची ताकद आणखी भक्कम होणार असल्याचे मत संपर्कप्रमुख मनोज शिंदे यांनी व्यक्त केले**



*बीड : शिवसेना महिला आघाडी माजी जिल्हाप्रमुख सौ. अलकाताई डावकर, युवासेना माजी शहराध्यक्ष प्रा. स्वप्नील भैय्या डावकर यांनी भाजपा जिल्हा कार्यालय बीड येथे जिल्हाध्यक्ष मा. शंकरजी देशमुख यांची सदिच्छा भेट घेऊन स्वागत केले. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ आण्णा शिराळे, नगरसेवक ॲड. गोविंद शिराळे उपस्थित होते.*






# नळातून शुद्धच पाणी यावे

दमयंतीने केली नसेल एवढी नळाची प्रतीक्षा केल्यावर एकदाची नळजोडणी होते, तेव्हा त्यातून फक्त पाणीच यावे, अशी अपेक्षा असते. 'हर घर जल' म्हणता म्हणता 'जल के साथ जीवजंतू' अशी स्थिती निर्माण होऊ नये.

वाळपईतील नळाच्या पाण्यात 'नूडल्स' सारखे जीवजंतू आढळल्याने नागरिकांतून चिंता व्यक्त होणे स्वाभाविक आहे. याकडे 'अपवादात्मक' बाब म्हणून पाहू नये. यापूर्वी दाबोळीतील 'प्रभू व्हायोलेटा' मध्ये दूषित पाण्याचा पुरवठा झाल्याने दीडशेहून अधिक लोकांना अतिसाराचा त्रास झाला होता. त्याकडे सरकारी यंत्रणांनी प्रारंभी दुर्लक्ष केले होते. नागरिकांना सुरक्षित व स्वच्छ पिण्याचे पाणी देणे प्रशासनाची मूलभूत जबाबदारी असताना अशा घटना घडणे योग्य नाही. राज्यातील पाणीपुरवठा व्यवस्था शेकडो किलोमीटर लांबीच्या जलवाहिन्यांच्या जाळ्यावर उभी आहे. साधारणतः हजारो किलोमीटर वाहिन्यांद्वारे पाणीपुरवठा केला जातो. यातील बहुतांश वाहिन्या २० ते ४० वर्षांपूर्वी बसवण्यात आलेल्या आहेत.

त्या एकाचवेळी बदलणे शक्य नसले तरी सध्या बऱ्याच जलवाहिन्या कालबाह्य झाल्या आहेत. गंज, गळती, जमिनीखालील हालचालींमुळे झीज वाढत असून त्यामुळे पाण्याच्या गुणवत्तेवर परिणाम होण्याची शक्यता वाढते. पाणीपुरवठ्यासाठी सहा प्रमुख जलशुद्धीकरण प्रकल्प कार्यरत आहेत. या प्रकल्पांची क्षमता तुलनेने चांगली असली तरी वाढती लोकसंख्या, पर्यटनाचा ताण तसेच जीर्ण वाहिन्यांमुळे अंतिम टप्प्यावर पाण्याच्या गुणवत्तेबाबत शंका निर्माण होते. सध्या जलशुद्धीकरण प्रकल्पांतून पाणी पंचायत, पालिका कार्यक्षेत्रांतील टाक्यांमध्ये जाते. तेथून घराघरांत पोहोचते. परंतु जो शेवटचा ग्राहक आहे, त्याला शुद्ध पाणी मिळते का, याची तपासणी कधी होते का?

राज्यात शेकडो टँकर आहेत. त्याद्वारे भरमसाठ पाण्याचा उपसा होतो. तो बोअरवेलमधून होतो, हे उघड आहे. त्यावर प्रक्रिया होत नाही. दूषित पाणी हा सरकार व लोकांनी गांभीर्याने घेण्याचा विषय आहे. युरोपमधील 'एस्टोनिया' हा बाल्टिक समुद्राच्या किनाऱ्यावर वसलेला छोटा देश. जो आकारमानाने गोव्याइतकाच आहे. हा देश शुद्ध व उच्च प्रतीच्या पिण्याच्या पाण्यासाठी ओळखला जातो. अनेक भागांत नळाचे पाणी थेट पिण्यास योग्य असते, जे विकसित देशांमध्येही क्वचितच पाहायला मिळते. तेथे आधुनिक जलशुद्धीकरण तंत्रज्ञान, सतत गुणवत्ता तपासणी, डिजिटल व्यवस्थापन यावर भर दिला जातो.

सरकारकडून पाणीपुरवठा व्यवस्थेची नियमित देखभाल, गळती नियंत्रण आणि प्रदूषण प्रतिबंधासाठी कडक नियम लागू केले आहेत. गोव्यात ते शक्य आहे. पेयजल खाते मंत्री सुभाष फळदेसाई यांच्याकडे आहे. त्यांनी ताबा स्वीकारताच बदलाची पावले उचलली आहेत. तथापि, समस्यांचा आवाकाही मोठा आहे. गोव्यानजीकच्या राज्यांत शुद्ध पाण्याची एटीएम मशीन्स आहेत. अगदी कर्नाटकात जाताना कुमठ्यानजीक महामार्गावर अशी बरीच मशीन्स आहेत. तशी यंत्रे गोव्यात उभारण्याची वेळ येऊ नये.

कोणत्याही हॉटेलात गेल्यास ग्राहकाला 'फिल्टर' केलेले पाणी मिळालेच पाहिजे, त्यासाठी जागृती व प्रसंगी दंडात्मक कारवाई करा, असे दिवंगत मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर यांची अधिकाऱ्यांना सूचना असे. आता तसेच पाऊल पूर्ण गोव्यासाठी उचलल्यास योग्य ठरेल. सत्तरीत जो प्रकार घडला तो कशामुळे, याचा तपास यंत्रणेला करावा लागेल. दुर्दैवाने, गंभीर परिणाम दिसल्याशिवाय प्रशासन जागे होत नाही. खरे तर प्रतिबंध महत्त्वाचा. सत्तरीत प्राथमिक पातळीवर क्लोरीनचे अस्तित्व आढळून आले असले तरी जलवाहिन्यांमधील स्वच्छतेचा अभाव, गळती किंवा साचलेली घाण यांसारख्या कारणांची शक्यता नाकारता येत नाही.

अलीकडच्या काळात दूषित पाण्याच्या घटना अधूनमधून समोर येत आहेत. अधिकृत पातळीवर अशा घटनांची नेमकी एकत्रित संख्या सातत्याने जाहीर केली जात नसली तरी समस्या वेगवेगळ्या भागांत पुन्हा-पुन्हा घडत आहेत. पाण्याच्या गुणवत्तेची सातत्याने तपासणी व तक्रार आल्यास त्याची त्वरेने दखल घेणे यास प्राधान्यक्रम राहायला हवा. घटना घडली, की जागे होणे व लगेच पुन्हा झोपी जाणे यंत्रणेस चांगलेच जमते. आता तसे घडू नये. ज्याची सेवा आपण देतो त्याची नियमित देखभालही करावी लागते. जलपुरवठा करणाऱ्या वाहिन्या शेवटच्या कधी तपासल्या होत्या, असा प्रश्न विचारल्यास खात्याकडे कदाचित उत्तर असणार नाही. बसवल्या की बसवल्या, त्या तपासायच्या नसतातच. अशा 'सुशासना'मुळे वाळपईत घडले तसे प्रसंग घडतात.

◆ पान ९ वरून पुढे...

## डिग्री दहावीची....

प्रकृती औषधांच्या ओव्हरडोजमुळे खालावल्याचे दिसले. २७ एप्रिल रोजी या महिलेला गर्भपातासाठी आणले होते. तिची प्रकृती बिघडल्याने तिला पहाटे ३:३० वाजता तातडीने 'घाटी' रुग्णालयात दाखल करण्यात आले. सध्या तिच्यावर उपचार सुरू असून तिची प्रकृती गंभीर असल्याचे समजते. या महिलेमुळेच या रॅकेटचा पर्दाफाश झाला आहे. तपासात या रॅकेटचे धागेदोरे सिडको एन-६ मधील 'बीटेल डायग्नोस्टिक पॅथलॅब'पर्यंत पोहोचले आहेत. लॅब चालक मंगेश थोरात आणि मीनाक्षी थोरात यांच्यासह शाहिदा परवीन, नसरीन शेख, सय्यद इर्शाद अहमद आणि पीडित महिलेच्या आईवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रशिदपुरा भागातील एका आलिशान बंगल्यात छुप्या पद्धतीने सुरू असलेल्या अवैध गर्भपात केंद्रावर पोलिसांनी मध्यरात्री धडक दिल्यानंतर हा सर्व प्रकार समोर आला. या कारवाईमुळे संपूर्ण जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे.

## आज पासून....

परभणी, महाएपीएसी फेडरेशन ओंकार साखर कारखाना , यांचा विशेष सहभाग या प्रदर्शनात असणार आहे. कृषी प्रदर्शनात भव्य अशा आठ दालनात तब्बल १५० कृषी उत्पादनांची स्टॉल यामध्ये असून कृषी अवजारांची प्रात्यक्षिके या प्रदर्शनात पाहण्यास मिळणार आहेत. दि १ मे शुक्रवार रोजी सकाळी ११:१५ वा. गेवराईचे लोकप्रिय आमदार विजयसिंह पंडित यांच्या शुभहस्ते व बीड नगर परिषद च्या नगर अध्यक्ष प्रेमलताताई पारवे यांच्या अध्यक्षतेखाली या प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे. तर प्रमुख अतिथी म्हणून बीडचे आमदार संदीप भैय्या क्षीरसागर हे उपस्थित राहणार आहेत. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राजुरेश्वर चव्हाण, अनिल जगताप, राजेंद्र मस्के, उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, सचिन मुळक, स्वप्निल गलधर, मुजीब भाई, निजामभाई, फारुख पटेल, प्रवीण कुमार बांगर, भाऊसाहेब नाटकर, गणेश उगले, ऋषिकेश बेद्रे, राजेंद्र मोटे, गंगाधर काळकुटे, बळीराम गवते, चंद्रकांत नवले, सचिन उबाळे, अमर नाईकवाडे, चंद्रकांत नवले, बी. बी जाधव मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे तर दि ३ रोजी विविध तज्ज्ञांची चर्चासत्र होणार आहे दि. ४ मे सोमवार रोजी दुपारी १२.३० वाजता कृषिरत्न पुरस्कार वितरण सोहळा व भव्य शेतकरी मेळावा होणार आहे महाराष्ट्राचे कृषी मंत्री नामदार दत्तामामा भरणे यांच्या हस्ते होणार आहे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी खासदार रजनी ताई अशोकराव पाटील या असणार आहेत प्रमुख अतिथी म्हणून नारायण गडाचे महंत शिवाजी महाराज हे असणार आहेत या शेतकरी मेळाव्याला विशेष उपस्थिती म्हूणन कुलगुरू डॉ. इंद्रामणी , बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे उपस्थित राहणार आहेत विशेष उपस्थिती म्हणून शिवसंग्राम चे अध्यक्ष ज्योतीताई मेटे, गेवराईचे माजी आमदार अमरसिंह पंडित हे उपस्थित राहणार आहेत तर काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, राष्ट्रवादी काँग्रेसचे राजेसाहेब देशमुख, शिव संग्राम चे जिल्हाध्यक्ष नारायण काशीद, संपादक गंमत भंडारी, अजित वरपे, दिलीप खिस्ती, शेख तय्यब, संतोष मानूरकर, सुनील शिरसागर,वसंत मुंडे, नरेंद्र कंकरिया, संजय मालानी ,बालाजी मारगुडे, कामरान शेख, जालिंदर धांडे,गणेश सावत,उत्तम हजारे,सुभाष चौरे, दिनेश लिंबेकर, अमोल मुळे आदि सर्व प्रसिद्धी माध्यमांच्या प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे दि. ५ मे रोजी एक दिवशी डॉग शो व समारोप सोहळा होणार आहे. या प्रदर्शनात विविध शेती विषयावर चर्चासत्रे आदी उपक्रम या प्रदर्शनात होणार असून वरील सर्व मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदर्शनाचे उद्घाटन व समारोप होणार आहे. तरी या प्रदर्शनाचा तालुक्यासह जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने संयोजक कृषिभूषण महेश बेदरे, ,स्वागताध्यक्ष दिलीपराव गोरे , निमंत्रक ,कार्याध्यक्ष कृषीभूषण शिवराम घोडके , स्वागत समिती प्रमुख गणेश बजगुडे, चंद्रकांत नवले , निमंत्रक जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे ,स्वागत समिती प्रमुख रमेश सानप, संभाजी जाधव,पुरस्कार समिती प्रमुख सुभाषराव सपकाळ , मान्यवर स्वागत समिती प्रमुख बंडू जटाळ, ॲड. गणेश करांडे ,नियोजन समिती प्रमुख कैलास रकटे, राहुल टेकाळे, गणेश राऊत,व्यवस्थापन समिती प्रमुख शिवाजीराव जाधव, अशोक कागदे, बलभीमराव बोरवडे,पशुप्रदर्शन समिती डॉ.संभाजी जाधव यांनी केले आहे

## आ.संदिप क्षीरसागरांनी....

न्यायालयातील वकीलांच्या मागण्या आणि मतदारसंघातील महत्वाचे असलेले विषय यांच्या अनुषंगाने आ.संदिप क्षीरसागर यांनी गुरूवार (दि.३०) रोजी महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री ना.सुनेत्राताई पवार यांची मुंबई येथे भेट घेतली. बीड शहरात सध्या २० दिवसांआड पाणी पुरवठा होत असल्याने नागरिकांचे मोठे हाल होत आहेत. पाण्याची उपलब्धता असून देखील बीड नगरपरिषदेकडे महावितरण विभागाची सुमारे ५६ कोटी रूपये वीज बील थकबाकी असल्याने सुरळीत पाणी पुरवठा करण्यासाठी अडथळा निर्माण झाला आहे. या संदर्भात पुर्वी स्व.अजितदादा पवार यांनी सकारात्मक भुमिका घेतली होती. त्याच धर्तीवर आ.क्षीरसागर यांनी सुनेत्राताई पवार यांनी देखील तातडीने निर्णय घेवून बीड शहराला न्याय देण्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी ठाम मागणी केली. तसेच, बीड जिल्ह्यात नियोजीत असलेला रेशीम पार्क जिल्ह्यातील शेतकड्यांच्या हितासाठी जिल्ह्याच्या मध्यवर्ती ठिकाणी असायला हवा. जिल्ह्यातील सर्व तालुक्यांसाठी दळण-वळणाच्या दृष्टीने बीड शहर हे मध्यवर्ती ठिकाणी असून रेशीम पार्क हे बीड कृषी उत्पन्न बाजार समिती, नवा मोंढा येथे व्हावे. जेणेकरून रेशीम उद्योगाला चालना मिळून, रेशीम उत्पादक शेतकरी बांधवांना त्याचा फायदा होईल. अशा प्रकारची आ.क्षीरसागर यांनी मागणी केली. या सोबतच बीड जिल्हा न्यायालयातील वकील बांधवांच्या विविध मागण्या असून त्यांना वकीली व्यवसाय करताना मुलभूत सोयी-सुविधांचा अभाव जाणवत आहे. जिल्हा न्यायालयाच्या इमारतीत ज्या ठिकाणी वकील बांधवांसाठी जागा उपलब्ध केलेली आहे. त्या ठिकाणी फर्निचर आणि इतर व्यवस्था नसल्यामुळे दैनंदिन कामकाजात अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे पालकमंत्री म्हणून विशेष निधीतून वकील बांधवांना फर्निचर आणि तत्सम सोयी-सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी विनंती आ.संदिप क्षीरसागर यांनी पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांच्याकडे केली. बीडच्या सर्वांगीण विकासासाठी आणि जनतेच्या मुलभूत प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी आपण कायम कटीबद्ध असून जनतेचा आवाज शासनापर्यंत पोहचविणे ही आपली जबाबदारी आहे. आणि ती आपण प्रामाणिकपणे पार पाडत राहू असे आ.संदिप क्षीरसागर यांनी सांगितले आहे.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे...

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी डॉ. थोरात व कार्यकर्त्यांचे स्वागत केले. यावेळी शिंदे यांनी शिवसेना ही सामान्य माणसाच्या हक्कांसाठी लढणारी संघटना असून, पक्षात येणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याला न्याय देण्याची आमची बांधिलकी आहे असे त्यांनी सांगितले. या पक्षप्रवेश सोहळ्यावेळी शिवसेना बीड लोकसभा संपर्कप्रमुख मनोज शिंदे, मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, अनिल जगताप, स्वप्निल गलधर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. याशिवाय महिला संपर्क प्रमुख संगीता चव्हाण, विधानसभा प्रमुख दादासाहेब ससाणे, युवासेना तालुकाप्रमुख दत्तकुमार काकडे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यांचाही शिवसेनेत प्रवेश- डॉ. प्रतिभाताई अशोक थोरात यांच्या समवेत अनेक कार्यकर्त्यांनीही शिवसेनेत प्रवेश केला. यामध्ये उद्धव दळवी, प्रमोद पाटील, राजा शेख, नंदकुमार कावळे, इंद्रजीत मोरे, लाला काकडे, अशोक पांचाळ, दादासाहेब घुगे, जीवन थोरात, विलास अंबाड, लालासाहेब शिंदे, दत्ता काकडे, अनिल जोगदंड, बजरंग काकडे, प्रकाश थोरात आदींचा समावेश होता. या सामूहिक प्रवेशामुळे शिवसेनेची संघटनात्मक ताकद अधिक बळकट झाल्याचे चित्र दिसून आले. या सामूहिक प्रवेशामुळे केज तालुक्यात शिवसेनेची संघटनात्मक ताकद वाढली आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## आष्टीत आरोग्य क्रांती....

आधुनिक उपचार सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध झाल्याने रुग्णांना मोठ्या शहरांकडे धाव घेण्याची गरज कमी झाली आहे. त्यामुळे आष्टी तालुका आरोग्य सेवेत आघाडीवर असल्याचे चित्र दिसून येत आहे.मात्र, पाटोदा तालुक्यात अजूनही उपजिल्हा रुग्णालयाची सुविधा उपलब्ध नसल्याने रुग्णांना उपचारासाठी इतर तालुक्यांमध्ये जावे लागत आहे. विशेष म्हणजे पाटोदा तालुक्यातून पैठण- पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग व बिदर- अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्ग असे दोन महत्त्वाचे मार्ग जात असून दररोज मोठ्या प्रमाणावर वाहतूक सुरू असते.गेल्या काही काळात या महामार्गांवर अपघातांच्या घटनांमध्ये वाढ झाली असून जखमींना तातडीने उपचार मिळणे अत्यंत आवश्यक ठरते. मात्र, पाटोद्यात उपजिल्हा रुग्णालय नसल्याने रुग्णांना तातडीच्या उपचारासाठी इतरत्र हलवावे लागते, ज्यामुळे जीविताचा धोका वाढत असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.या पार्श्वभूमीवर गणेश शेवाळे यांनी प्रशासनाकडे ठाम मागणी करत सांगितले की, आष्टीप्रमाणेच पाटोदा तालुक्यातही उपजिल्हा रुग्णालय, ट्रामा सेंटर, डायलिसिस व सोनोग्राफीसारख्या सुविधा तातडीने उपलब्ध करून द्याव्यात.

## परळी नगर परिषदेच्या....

गाडी वेळेत पोहोचत नाही, ही अत्यंत गंभीर आणि लाजिरवाणी बाब आहे. हा प्रकार म्हणजे नागरिकांच्या जीवाशी व मालमत्तेशी थेट खेळ आहे, अशा शब्दांत त्यांनी प्रशासनाचा समाचार घेतला. बागवाले यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर तात्काळ कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच शहरातील अग्निशमन यंत्रणा अधिक सक्षम व तत्पर करण्यासाठी ठोस उपाययोजना न झाल्यास परळीकरांच्या हितासाठी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला आहे.दरम्यान, या घटनेमुळे शहरातील व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, नगर परिषदेच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## कर्जबाजारी शेतकऱ्याची....

आर्थिक मदत करावी अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. वडवणी तालुक्यात शेतकऱ्यांचे जीवन अत्यंत हलकीचे झाले आहे. कधी कोरडा तर कधी ओल्या दुष्काळाचा सामना शेतकऱ्यांना करावा लागतो. सन २०२५च्या खरीप हंगामात वडवणी तालुक्यात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली होती. त्यामध्ये पिकाचे मोठे नुकसान झाले होते. शेतकऱ्यांच्या हातातील सर्व पीक वाया गेले होते. शासनाने तुटपुंजी आर्थिक मदत केली मात्र एप्रिल महिना संपत आला तरी अद्यापही पिक विमा शेतकऱ्यांना दिला नाही. कर्जमाफीचे भिजत घोंगडे अजूनही चालू आहे. शेतमालाला योग्य भाव नाही त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडलेले आहेत. वडवणी तालुक्यातील चिंचवडगाव येथील उत्तम भानुदास तिडके हे ६२ वर्षीय वृद्ध शेतकरी दोन एकर जमिनीवर उदरनिर्वाह करत होते. दोन मुलं विवाहित असून कारखान्यावर ऊस तोडणी करून उदरनिर्वाह करतात. तर तीन मुलींचे लग्न झालेले आहेत. घरातील आर्थिक अडचणी भागवण्यासाठी त्यांनी बँकांकडून व खाजगी कर्ज उचलले होते मात्र शेतीतून काही उत्पन्नच मिळत नसल्यामुळे त्यांच्याकडून कर्जाची परतफेड झाली नाही. लोकांची आणि बँकांची देणे कसे फेडायची या अडचणीतून ते नेहमीच तणावात असत त्यातच दवाखाना आणि घर खर्च भागविण्याच्या अडचणी नेहमी होत्या. या तणावातूनच त्यांनी बुधवारी सकाळी आठ वाजता विषारी औषध प्राशन केले. कुटुंबियांच्या लक्षात आल्यानंतर त्यांना तत्काळ बीडच्या जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले मात्र तेथे जाण्या अगोदरच त्यांची प्राणज्योत मालवली या घटनेमुळे वडवणी तालुक्यात शोककाळा पसरली आहे. सदर शेतकऱ्याचे कुटुंब उघड्यावर पडले असून या कुटुंबाला तात्काळ आर्थिक मदत करावी अशी मागणी सर्व पक्ष संघटनांच्या कार्यकर्त्यांनी केली आहे.

## परळीत सोमवारी...

दृष्टीकोन या निर्णयातून अधोरेखित झाला आहे. या निर्णयासाठी मा. पंकजाताई गोपीनाथराव मुंडे (पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री, महाराष्ट्र राज्य) व मा. आमदार धनंजय मुंडे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच उपनगराध्यक्षा सौ. खैसर राजा खान पठाण, गटनेते तसेच सर्व नगरसेवक-नगरसेविका यांच्या एकमताने हा ठराव मंजूर करण्यात आला. या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते श्री. शिवकुमार केदारी (हिंद नगर, परळी वैजनाथ) यांनी या निर्णयाचे स्वागत करत सर्व पदाधिकारी व सदस्यांचे मनःपूर्वक आभार मानले. तसेच या विषयाला व्यापक प्रसिद्धी देणाऱ्या सर्व पत्रकार, ऑनलाइन न्यूज चॅनल व टीव्ही प्रतिनिधी यांचेही त्यांनी विशेष आभार व्यक्त केले.

## अमरसिंह पंडित....

म्हणाले की, मुस्लिम समाजाच्या विवाह सोहळ्यात गेवराईत पाहुण्यांच्या जेवणासाठी कोंडवाड्यासारखी खूपच छोटी जागा असल्यामुळे वधू पक्षाकडील मंडळींना ऐपत नसतानाही वर पक्षाकडील मंडळींच्या सोयीसाठी नाविलाजास्त मोकळ्या जागेत मंडप लावून विवाह सोहळ्यासाठी सोय करावी लागते. अशाप्रकारे त्यांना नाहक भुर्दंड सहन करावा लागत आहे. या सर्व बाबींची गांभीर्याने दखल घेऊन गोर-गरीब मुलींच्या लग्नकार्याची सोय व्हावी म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस तथा माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी गेवराई येथील मुस्लिम बांधवांसाठी सर्व सोयींनीयुक्त अशा भव्य-दिव्य शादीखान्यासाठी दोन कोटी रुपयांचा निधी मंजूर करून दिला. काम सुरू झाल्यानंतर आणखी दोन कोटींचा निधी उपलब्ध होणार असून अशाप्रकारे पाच कोटींपर्यंत हे काम जाणार आहे. आपल्या स्वप्नातला शादीखाना उभारण्यासाठी अमरसिंह पंडित यांनी गेल्या एक वर्षापूर्वी गेवराई कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती मुजीब पठाण यांच्यासह मुस्लिम कार्यकर्ते आणि इंजिनिअर सोबत बीड शहरातील कोहिनूर लॉन्स, किंग पॅलेस, ताज फंक्शन हॉल, जी. एन. फंक्शन हॉल आदी नामांकित शादीखान्याची पाहणी केली. याबाबत कृष्णाई व मार्केट कमिटी मध्ये अमरसिंह पंडित यांनी मुस्लिम समाजाच्या अनेक बैठका घेतल्या. या सर्व बैठक घेतल्या नतंर शादिखाना हा तय्यब नगर येथेच करण्यात यावे अशी एखामुखाने मंजुरी देण्यात आली व या शादिखाण्याचे भूमिपूजन झाले. ज्या जागेवर हा शादिखाना उभाराहणार आहे ती जागा सध्या मोकळी करुन देण्यात आली नाही. सध्या ती जागा दारूलउल्लूम च्या सर्वेसर्वा मुफ्ती मोईनोद्दीन कासमी व मेन रोड अत्तार समाज देखरेखीखाली आहे भूमिपूजन झाल्या पासून आपण दर आढवड्याला मुफ्ती मोईनोद्दीन कासमी याच्या कडे हजेरी लावत आहे व जागा मोकळी करून देण्यास विनंती करत आहे परंतु असे वाटते की मुफ्ती मोईनोद्दीन कासमी यांच्या वर कोणाकडून तरी दबाव आणले जात आहे त्या मुळे सदर जागा मोकळी करून देण्यास तयार होत नाहीत. मुफ्ती मोईनोद्दीन कासमी यांच्या वर राजकीय दबाव आहे? का त्या समाजाचा दबाव आहे?का ही जागा मोकळी करून देण्यात का येत नाही? जागा व मोकळी करून देणाऱ्याचे ही चूक नाही का?फक्त विरोध म्हणून समाजामध्ये अमरसिंह पंडित याची प्रतिमा मलिन करण्याची सुपारी घेतली का? असा सवाल उपस्थित करुन सदर शादीखाण्याची कामाची मुदत संपली असताना अमरसिंह पंडित यांनी पुन्हा मुदत वाढ करून आणली आहे तरी पण सदर जागा मोकळी करून देण्यास मुफ्ती मूईनोद्दीन कासमी तयार नाही? यात कोणाची चूक आहे हे समाजानी मुफ्ती मूईनोद्दीन कासमी यांना विचारावे असेही बाबुभाई म्हणाले. पूर्ण माहिती घेऊन जेष्ठ पत्रकारानी पत्रकबाजी करावी उगाच विरोध म्हणून विरोध करू नये. हाच जेष्ठ पत्रकार जेव्हा दारुलउलूम ची बॉडी तयार होत होती तेव्हा याला बॉडी मध्यें सामावून घेण्यात आले नव्हते तेव्हा पण या या पत्रकाराने मुफ्ती मोईनोद्दीन कासमी यांच्या विरोधात बातम्या केल्या होत्या. अमरसिंह पंडित शादीखाना बनवून देण्यास तयार आहे व ते देणार ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे त्या जेष्ठ पत्रकाराने पुढाकार घेऊन मुफ्ती मोईनोद्दीन कासमी यांना सदर जागा मोकळी करून देण्यास सांगावे असेही जेके बाबुभाई म्हणाले.

## सुशी येथे डॉ.बाबासाहेब ....

जयंती मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरी करण्यात आली. यावेळी पंचायत समिती सदस्य तथा गटनेते परमेश्वर खरात यांच्या हस्ते ध्वजारोहण करुन अभिवादन करण्यात आले. तर दि.२७ एप्रिल २०२६ रोजी भव्य मिरवणूक काढण्यात आली होती या मिरवणुकीत गावातील सर्व जाती-धर्मातील तरुणांनी एकत्र येत सामाजिक ऐक्याचे दर्शन घडवले. . भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सुशी येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. जयंतीनिमित्त गावात उत्साही वातावरण निर्माण झाले होते. बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन मिरवणूक मार्गावरुन मिरवणूक काढत अभिवादन करुन तरुणांनी त्यांच्या विचारांचा प्रचार-प्रसार करण्याचा संकल्प केला. तर यावेळी कार्यक्रमास सुशी च्या सरपंच शशिकलाबाई कांबळे , रिपाइंचे तालुकाध्यक्ष किशोर कांडेकर, मनोज हजारे, वंचित बहुजन आघाडीचे युवा जिल्हा संघटक प्रदीप तुरुकमारे, उपसरपंच गजानन मोंढे, विजय पौळ, विजय राठोड, पंडित तुरुकमारे, लक्ष्मण तुरुकमारे ,संदीप तुरुकमारे, बबन तुरुकमारे, सोमनाथ तुरुकमारे, सुर्यकांत तुरुकमारे, विक्रम तुरुकमारे, दौलत तुरुकमारे ,केरबा कांबळे, सयाजी कांबळे, सर्जेराव कांबळे, नंदु मोंढे, संभाजी पौळ, विठ्ठलमामा राऊत यांच्यासह गावातील जेष्ठ मान्यवर उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमात महिलांसह अबालवृद्धांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला होता सर्वांनी एकत्र येत बाबासाहेबांच्या समतेच्या आणि बंधुतेच्या विचारांना उजाळा देत जयंती उत्साहात साजरी केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भिम वादळ ग्रुप, सुशी (व) यांच्यासह गावातील तरुणांनी परिश्रम घेतले.

## राज्यात ३०० कोटी..

होऊन तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले होते. जागेच्या उपलब्धतेबाबत राज्य सरकारने चिंता करण्याची गरज नसून कमी जागेत अधिकाधिक वृक्षलागवड करण्याचे कौशल्य बीड प्रशासनाकडे असल्याचा दावा करत, या 'महारथी' अधिकाऱ्यांना हरित महाराष्ट्र आयोगाच्या नियामक मंडळावर संधी देण्यात यावी, अशी मागणी डॉ. ढवळे यांनी केली आहे.

## दिंद्रुड येथे...

चांगलेच खिळवून ठेवले होते, दोनच राजे इथे गाजले, कोकण पुण्यभूमीवर,एक त्या रायगडावर, एक चवदार तळ्यावर या गीताला दिंद्रुड च्या ग्रामस्थांनी चांगलीच दाद दिली. दिंद्रुड येथे क्रांतीसुर्य महात्मा फुले व विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची एकत्रित जयंती साजरी करण्यात येते. या पार्श्वभूमीवर तीन दिवस विविध प्रकारचे उपक्रम राबवले जातात. यावर्षी आरोग्य शिबिर, संगीत मैफिल व भव्य मिरवणुकीचे आयोजन दिंद्रुड ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले होते. दिंद्रुडचे भुमीपुत्र पोलीस उपनिरीक्षक रवी देशमाने यांच्या हस्ते ध्वजारोहण करत कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली, निघालेल्या भव्यदिव्य मिरवणुकीत महिलांसह पुरुषांची संख्या लक्षणीय होती, बाल चिमुकल्यांचा या मिरवणुकीत लेझीमचा धरलेला ताल पहाणाऱ्यांना थक्क करणारा होता, जयंतीच्या औचित्याने समाजोपयोगी सर्व उपक्रमात सर्व जाती धर्माची लोक उत्साहात सहभागी झाले होते. सुनील मायंदळे यांच्या अध्यक्षतेखाली सचिन देशमाने, विकी देशमाने, विलास देशमाने, सुरेश देशमाने, राज पायके, सोनाजी मायंदळे, किरण धुमाळ, बाळू देशमाने आदी पदाधिकाऱ्यांनी जयंती उत्सवाच्या आयोजन केले होते.

## जिल्हा परिषद....

श्री. वैभव बिडकर सर (माजी विद्यार्थी) व्हाईट बोर्ड (०१) ११) श्री.प्रफुल टकले सर (माजी विद्यार्थी) व्हाईट बोर्ड (०१) १२) बालाघाट फिटनेस ग्रुप संपूर्ण लाईट फिटिंगचा खर्च १३) महादेव खुपसे पेंटर व नंदकुमार खुपसे =सर्व शाळेला रंगरंगोटी १४) सुरज टोम्पे सर चौडेश्वरी क्लासेस=सर्व महापुरुष फोटो संच १५) वचिष्ठ अण्णा वरवडे माजी सरपंच जागा उपलब्ध १६) विलास अण्णा ढोले सर्व पाणी बांधकाम साठी पुरवठा १७) कल्याण वारे पिण्याचे पाण्याची सोय विद्यार्थ्यांना कायम १८) गणेश टकले शालेय अध्यक्ष कागद पूर्तता १९) ज्ञानेश्वर रोकडे महाराष्ट्र कोष्टी समाज अध्यक्ष वडवणी १५÷१५ च्या ५ चटाई २०) रामेश्वर पारखे शाळेसाठी संगणक व प्रिंन्ट मशीन १, २१) परमेश्वर कुरकुटे २ शिक्षक टेबल, २२) सौ.मिना नवनाथ रोकडे १० खुर्च्या ,२३) गणेश माळवदे १ व्हाईट बोर्ड, २४) लहू खारगे २ साऊंड व २ माईक, २५) ऋषिकेश तेटांबे १ टेबल, २६) कृष्णा महादर २ साऊंड कर्ना २७) शोभाताई खाटवकर तर्फे भाषण डाईस १, २८) तिरुपती ग्रुप ४० लेक्षीम तसेच बालाघाट मॉर्निंग ग्रुप च्या वतीने सर्व शाळा परिसर स्वच्छ, साफसफाई करून दिली.आपल्या सर्वांच्या सहकार्याने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,रामबाग वडवणी ही आता नूतन सुसज्ज इमारतीमध्ये स्थलांतरित होत आहे. या प्रवासात शाळेच्या प्रगतीसाठी आणि विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी अनेक माजी विद्यार्थी, प्रतिष्ठित नागरिक, शिक्षणप्रेमी आणि युवा उद्योजकांनी आपले मोलाचे योगदान दिले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# कर्करोग रुग्णांच्या जीवनातील आशेचा किरण

## शासकीय कर्करोग रुग्णालयाचा सेवा आणि उपचाराचा वाढता लौकीक

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

केवळ मराठवाडा विभागातीलच नव्हे तर उत्तर महाराष्ट्र, विदर्भ भागातील कर्करोग रुग्णांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व कर्करोग रुग्णालयाने दर्जेदार व सुलभ उपचार देऊन लौकीक प्राप्त केला आहे. कर्करोगाशी झुंजणाऱ्या रुग्णांना हे रुग्णालय म्हणजे आशेचा किरण होय. स्थापनेपासून आजपर्यंत लाखो रुग्णांना सेवा देऊन या रुग्णालयाने अनेकांच्या जीवनात आनंद निर्माण केला आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.शिवाजी सुक्रे व शासकीय कर्करोग रुग्णालयाचे विशेष कार्य अधिकारी डॉ. अरविंद गायकवाड यांच्या कुशल नियोजन आणि प्रशासनामुळे येथील सेवांचा दर्जा उंचावला असून रुग्ण बरे होऊन हसऱ्या चेहऱ्याने आपल्या कुटूंबात परत जातात हा त्यांच्या समाधानाचा क्षण असल्याचे डॉ. सुक्रे व डॉ. गायकवाड सांगतात. कर्करोग आणि त्यावर मात करण्यासाठी रुग्णाला द्यावी लागणारी झूंज ही केवळ रुग्ण आणि आजार यांच्यातील झूंज नसून त्यात उपचार करणाऱ्या वैद्यकीय पथकाचे योगदान मोठे असते. ते योगदान शासकीय कर्करोग रुग्णालय समर्थपणे देत आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,छत्रपती संभाजीनगर ( पूर्वीचे औरंगाबाद ) येथे सन १९८४ मध्ये किरणोपचार विभागाची स्थापना करण्यात आली. त्यानंतर राज्य शासनाच्या पुढाकारातून या रुग्णालयाचा सातत्याने विस्तार होत आज ते अत्याधुनिक सुविधा असलेले महत्त्वाचे कर्करोग उपचार केंद्र बनले आहे. सन २००८ मध्ये



महाराष्ट्र शासनाने या रुग्णालयाला मान्यता देत बांधकामास सुरुवात केली. यासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. पुढे सन २०११ मध्ये शासन निर्णयानुसार वैद्यकीय अधिकारी, परिचारिका व प्रशासकीय कर्मचाऱ्यांची ३५९ पदे मंजूर करण्यात आली. दि. २१ सप्टेंबर २०१२ रोजी रुग्णालयाचा अधिकृत शुभारंभ झाला. येथे पॅथॉलॉजी, मायक्रोबायोलॉजी, बायोकेमिस्ट्री, रेडिओ डायग्नोसिस यांसह १०० खाटांची व्यवस्था, ४ शस्त्रक्रिया कक्ष, किमोथेरपी व किरणोपचार सुविधा सुरू करण्यात आल्या. सिटी सिम्युलेटर, ब्रॅकीथेरपी व लीनियर ॲक्सिलरेटर यांसारखी आधुनिक यंत्रसामग्रीही उपलब्ध झाली. सन २०१५ मध्ये टाटा मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई यांच्याशी डॉ.कैलास शर्मा, शैक्षणीक संचालक, टाटा रुग्णालय, मुंबई यांच्या समन्वयाने सामंजस्य करार करण्यात आला. या अंतर्गत टाटा रुग्णालय मुंबईद्वारे भाभाट्रॉन–खख यंत्र देण्यात आले, ज्यामुळे उपचाराची प्रतीक्षा कमी झाली आणि मुंबईकडे जाणाऱ्या रुग्णांची संख्या घटली.

सन २०१६ मध्ये या रुग्णालयाला राज्य कर्करोग संस्था दर्जा मिळाला. पुढे केंद्र व राज्य शासनाच्या सहाय्याने ९७ कोटींचा निधी मिळून सुविधांचा विस्तार करण्यात आला. शैक्षणिक क्षेत्रातही प्रगती करत २०१८ मध्ये एम.डी. रेडिओथेरपी आणि २०२० मध्ये एम.सी. एच. सर्जिकल ऑन्कोलॉजी अभ्यासक्रम सुरू करण्यात आले.

सन २०२१ पासून डीएम पेडियाट्रिक ऑन्कोलॉजी आणि एमआरआय सुविधा सुरू झाली. सन २०२४ मध्ये चार विषयात सुपर स्पेशालिटी अभ्यासक्रम सुरू झाले. २०२५ मध्ये रोबोटिक सर्जरी युनिट, १२८ स्लाइस सी.टी. स्कॅन व पॅलिअटिव्ह मेडिसिन विभाग सुरू करण्यात आला. दि. २७ एप्रिल २०२५ रोजी विस्तारित इमारतीचे उध्दघाटन केंद्रीय आरोग्य मंत्री मा.ना.श्री.जे. पी.नडडा, मा.मुख्यमंत्री ना.श्री. देवेंद्र फडणवीस व वैद्यकीय शिक्षण मंत्री ना.श्री.हसन मुश्रीफ यांच्या हस्ते झाले. यामध्ये ३०० खाटा, नवीन आयपीडी वॉर्ड, डे–केअर सुविधा तसेच डिजिटल मॅमोग्राफीची सुविधा सुरू झाली. सध्या रुग्णालयात मेडिकल, सर्जिकल, हेड अँड नेक, गायकॅनोलॉजिकल, पेडियाट्रिक, रेडिएशन ऑन्कोलॉजीसह विविध विभाग कार्यरत आहेत. तसेच ग्रामीण व शहरी भागात कर्करोग जनजागृती व स्क्रिनिंग मोहिमा राबवल्या जात आहेत.

आयुष्मान भारत व महात्मा फुले जनआरोग्य योजना यांसारख्या योजनांमुळे गरीब रुग्णांना मोठा दिलासा मिळत आहे. विविध स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने रुग्ण व नातेवाईकांसाठी निवास, भोजन व इतर सुविधा पुरवल्या जात आहेत.

रुग्णसेवेची ठळक आकडेवारी (२०१२ ते मार्च २०२५)– ओपीडी रुग्ण: ४.४२ लाख

आयपीडी रुग्ण: ६३,२९८

मोठ्या शस्त्रक्रिया: ११,४०४

लहान शस्त्रक्रिया: ११,३८४

केमोथेरपी (डे–केअर): १.२४ लाख

आयसीयू रुग्ण: ९,५३०

एक्स–रे: ८२,५३८

सोनोग्राफी: ८८,४७६

या रुग्णालयातील सद्य परिस्थितीतील सोयी सुविधा व भविष्यात प्रिव्हेन्टीव्ह ऑन्कोलॉजी अभ्यासक्रम, मॉलिक्युलर प्रयोगशाळा व बोन मॅरो ट्रान्सप्लांट युनिट सुरू करण्याकरीता सचिव वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये धीरजकुमार, आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष आणि संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन अनिल भंडारी यांच्या मार्गदर्शनाखाली संस्था प्रयत्न करत आहे. सद्यस्थितीत मंजूर असलेल्या ७१९ पदांपैकी ५२९ पदे कार्यरत असून १९० पदे रिक्त आहेत. तरीही छत्रपती संभाजीनगर येथील हे शासकीय कर्करोग रुग्णालय मराठवाड्यासह राज्यातील रुग्णांसाठी जीवनदायी ठरत असून अत्याधुनिक उपचार, शैक्षणिक प्रगती आणि व्यापक सेवा यामुळे त्याची ओळख अधिक बळकट होत आहे.

# दिल्लीत महिला साहित्य संमेलन ; डॉ. शारदा चोंडेकरांच्या प्रतिभेची दखल

**नांदेर्ड । प्रतिनिधी**

देशाची राजधानी नवी दिल्ली येथे दि. ११ व १२ एप्रिल २०२६ रोजी आयोजित पहिल्या अखिल भारतीय महिला शासकीय अधिकारी मराठी साहित्य संमेलनात नांदेड जिल्ह्याच्या डॉ. शारदा चोंडेकर यांनी आपल्या काव्यप्रतिभेने ठसा उमटवला. महाराष्ट्र सदनात पार पडलेल्या या संमेलनात विविध राज्यांतील महिला अधिकाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग नोंदवला गेला. 'जागर कर्तृत्वाचा, उत्सव साहित्याचा' या ब्रीदाखाली झालेल्या या उपक्रमात साहित्य आणि प्रशासन यांचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला.



किनवट सारख्या आदिवासी बहुल आणि दुर्गम भागात तहसीलदार म्हणून कार्यरत असलेल्या डॉ. शारदा चोंडेकर या संमेलनाच्या निमंत्रित प्रतिनिधी होत्या. बहिणाबाई चौधरी सभागृहात त्यांनी सादर केलेल्या काव्यमय अभिव्यक्तीला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. त्यांच्या साहित्यकृतीतून उमटलेले संवेदनशील आणि सामाजिक भान असलेले विचार विशेष लक्षवेधी ठरले. त्यांच्या सहभागामुळे मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व राष्ट्रीय स्तरावर ठळकपणे अधोरेखित झाले.

### ● नांदेडचे प्रतिनिधित्व ठरले लक्षवेधी

**डॉ. शारदा चोंडेकर यांच्या प्रभावी काव्यसादरीकरणामुळे नांदेड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व विशेष लक्षवेधी ठरले. प्रशासन आणि साहित्य या दोन्ही क्षेत्रांत त्यांनी साधलेला समतोल हा अनेकांसाठी प्रेरणादायी ठरला असून त्यांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.**

या संमेलनात देशभरातील महिला शासकीय अधिकारी सहभागी झाल्या होत्या. प्रशासनात कार्यरत असलेल्या महिलांच्या सर्जनशीलतेला व्यासपीठ देण्यासाठी या संमेलनाचे आयोजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात सरहद संस्था व नवी दिल्लीतील महाराष्ट्र सदनच्या निवासी आयुक्त सचिव श्रीमती आर विमला यांनी केले होते. ग्रंथदिंडी, चर्चासत्रे, प्रकट मुलाखती आणि कविसंमेलने अशा विविध उपक्रमांद्वारे उत्साहात संपन्न झाले.

या संमेलनाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. मराठी भाषा मंत्री उदय सामंत, संमेलनाध्यक्ष लीना मेहेंदळे, स्वागताध्यक्ष सुप्रिया देवस्थळी, राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांची प्रमुख उपस्थिती होती. 'सरहद, पुणे' आणि सचिव तथा महाराष्ट्र सदनाच्या निवासी आयुक्त आर. विमला यांच्या पुढाकारात राज्य शासनाच्या मराठी भाषा विभागाच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता.

स्त्री–अधिकाऱ्यांच्या साहित्य निर्मितीतून प्रशासन अधिक संवेदनशील, सृजनशील आणि लोककल्याणकारी होऊ शकते, हा विचार केंद्रस्थानी होता.



*महाराष्ट्र दिनाच्या पूर्वसंध्येला जिल्हाधिकारी कार्यालय परभणी विद्युत रोषणाईने उजळले*

# परभणी तालुक्यातील एकसाल लावणीची ११ मे रोजी हर्राशी

**परभणी । प्रतिनिधी**

परभणी तालुक्यातील विविध गावांतील गट क्रमांकांमध्ये सन २०२६–२७ या वर्षासाठी एकसाल लावणीची हर्राशी प्रक्रीया (दि. ११ मे) रोजी सकाळी ११ वाजता तहसिल कार्यालय परभणी येथे पार पाडली जाणार आहे.

या हर्राशीत पोरजवळा (गट नं. ६८, क्षेत्रफळ ५ हे. ५२ आर.), जलालपूर (गट नं. ६८, क्षेत्रफळ २ हे. ३० आर.), धर्मापुरी (गट नं. १९९, क्षेत्रफळ १२ हे. ०६ आर.), पिंपळा (गट नं. ७९, क्षेत्रफळ ४ हे. ४६ आर.) तसेच पिंपरी देशमुख (गट नं. १८३, क्षेत्रफळ १२ हे. १४ आर.) या गावांतील जमिनींचा समावेश आहे. हर्राशीच्या प्रक्रियेसाठी काही अटी व नियम निश्चित करण्यात आले असून, सर्वाधिक रक्कमेची बोली लावणाऱ्यास हर्राशी मंजूर करण्यात येईल. हर्राशी मंजूर होताच संपूर्ण रक्कम तत्काळ जमा करणे आवश्यक राहील. तसेच रूपये १०० च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करणे बंधनकारक आहे. बोली लावण्यापूर्वी सरकारी रकमेच्या ५० टक्के रक्कम आगाऊ भरावी लागणार असून, पूर्वीची थकबाकी असलेल्या व्यक्तींना बोली लावता येणार नाही. हर्राशी अंतिम करण्याचे तसेच बोली स्वीकारणे किंवा नाकारणे याचे अधिकार उपविभागीय अधिकारी, परभणी यांचेकडे राहणार आहेत. अंतिम बोलीनंतर त्याच दिवशी संपूर्ण रक्कम भरल्यानंतरच संबंधित ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांच्या मार्फत एकसाल लावणी जमीन ताब्यात देण्यात येईल. तरी हर्राशीसाठी इच्छुकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन तहसिलदार डॉ. संदिप राजापुरे यांनी केले आहे.

# थॅलेसेमिया मुक्त महाराष्ट्रासाठी १ ते ८ मे कालावधीत "संकल्प सप्ताह" - आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर

### ● जनजागृती, तपासणी आणि प्रतिबंधाचा संकल्प आठवडाभर राबविण्यात येणार विविध उपक्रम

**परभणी । प्रतिनिधी**

दि. ८ मे जागतिक थॅलेसेमिया दिवसाचे औचित्य साधून थॅलेसेमिया मुक्त महाराष्ट्र अभियानच्या वर्षपूर्ती



निमित्ताने राज्यात १ ते ८ मे २०२६ या कालावधीत संकल्प सप्ताहराबविण्याची सूचना राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे–बोर्डीकर यांनी दिल्या. संकल्प सप्ताहाच्या अनुषंगाने मुंबई येथील आरोग्य भवन येथे आरोग्य विभागाची घेण्यात आलेल्या बैठकीत श्रीमती बोर्डीकर बोलत होत्या. एक पाऊल थालेसेमिया मुक्तीकडे अभियान हे राज्यातील महत्वकांक्षी व लोककल्याणकारी मोहीम असून दिनांक ८ मे रोजी या अभियानास एक वर्ष पूर्ण होत आहे. या निमित्ताने राज्यभर प्रभावी जनजागृती, तपासणी व समुपदेशन वाढविण्याच्या उद्देशाने राज्यात संकल्प सप्ताह राबविला जाणार आहे. या सप्ताहाच्या माध्यमातून व्यापक लोकसहभाग निर्माण करून थॅलेसेमिया प्रतिबंधाला गती देणे हे मुख्य उद्देश असून याकरीता संकल्प सप्ताहराबविण्यात येणार असल्याचे या अभियानाचे राज्य समन्वक लक्ष्मीकांत पिंपळगावकर यांनी सांगितले. आठवड्याभरात व्यापक लोकसहभाग वाढवण्यासाठी व जनजागृती करीता आरोग्य कर्मचारी यांचे प्रशिक्षण घेण्यात येणार आहे.

# रांजनी बीटमध्ये आगामी शैक्षणिक वर्षासाठी नियोजन बैठक संपन्न

**जालना । प्रतिनिधी**

शाळांमध्ये केवळ पुस्तकी शिक्षण देऊन चालणार नाही, तर विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करणे आवश्यक आहे. जागतिक पुस्तक दिनाचे औचित्य साधून प्रत्येक जिल्हा परिषद शाळेत सुसज्ज ग्रंथालय सुरू करावे आणि विद्यार्थ्यांना अवांतर वाचनासाठी प्रवृत्त करावे, असे आवाहन शिक्षण विस्तार अधिकारी अशोक सोळंके यांनी केले. घनसावंगी तालुक्यातील रांजनी बीटमधील केंद्रप्रमुख आणि मुख्याध्यापकांची आगामी शैक्षणिक वर्ष २०२६–२७ ची नियोजन बैठक सरस्वती भवन विद्यालय, राजनी येथे पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून सोळंके बोलत होते. यावेळी व्यासपीठावर केंद्रप्रमुख श्री. पवार, श्री. डोळझाके, दिलीप महाजन यांची प्रमुख उपस्थिती होती. दि. १ मे २०२६ रोजी महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून शाळांमध्ये नवीन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. ६ वर्षे पूर्ण झालेल्या प्रत्येक बालकाला शाळेच्या प्रवाहात आणण्यासाठी मुख्याध्यापकांनी विशेष प्रयत्न करावेत, अशा सूचना यावेळी देण्यात आल्या.


दैनिक मराठवाडा पत्र

**टी.सी. हरवला आहे.**

**आनिल गोरखनाथ रुपनर या नावाचा इयत्ता दहावी पास चा टीसी आडगाव ते माजलगाव प्रवासा दरम्यान हरवला आहे, सापडल्यास संपर्क साधावा .**

**मो ९०९६४६३९००**



**जाहीर प्रगटन**

**मा. श्री. कृष्णराव के. पाटील २ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ५५७ / २०२६**

**कसुदा ढेरे वि. निल**

मागणी : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत

अर्जदारः **(१) कसुदा भ्र. मारूती ढेरे, वयः ७२ वर्षे, धंदा घरकाम, रा. रामनगर पो. जिरेवाडी, ता. जि. बीड २) आशा भ्र. हरिदास मोहिते, वय ६० वर्षे, धंदा घरकाम, रा. पिंपळवाडी पोसाकत जामखेड, ता. जि. अहमदनगर. ३) लहु मारूती ढेरे (मयत) ३– अ) उषा पि. हलु ढेरे, वयः ४१ वर्षे, धंदा घरकाम, रा. रामनगर पो. जिरेवाडी, ता. जि. बीड३– ब) अनिता पि.हलु ढेरे, वयः सज्ञान धंदा : शिक्षण, रा. वरील प्रमाणे. ३– क) वनिता पि.हलु ढेरे, वयः सज्ञान, धंदा शिक्षण, रा. वरील प्रमाणे. ४) महानंदा भ्र. साहेबराव नांदे, वय ५१ वर्षे, धंदा घरकाम, रा. कोळवाडी, ता. जि. बीड ५) कांचन भ्र. ज्ञानोबा सुरवसे, वय ५० वर्षे, धंदा घरकाम, रा. रामनगर पो. जिरेवाडी, ता. जि. बीड**

विरूध्द निरंक

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. ज्याअर्थी **मयत नामे मारूती तात्याबा ढेरे, राहणार रामनगर जिरेवाडी, ता. जि. बीड हे दिनांक १४/०४/२०२४ रोजी रामनगर जिरेवाडी, ता. जि. बीड** येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार क. १ हे मयताचे पती असुन अर्जदार क्र. २ ही मयताची मुलगी आहे व अर्जदार क. ३ हा मयताचा मुलगा असुन तो मयत झालेला आहे. अर्जदार क्र. ३ (अ) ही मयताची सुन असुन अर्जदार क. ३(ब) व ३ (क) यांचे हया मयताचे नाती आहेत. अर्जदार क्र. ४ व ५ हया मयताचे मुली आहेत.

मयत नामे मारूती तात्याबा ढेरे, यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु **मयत मारूती तात्याबा ढेरे** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सदर प्रकरणात पुढील तारीख ०५/०५/२०२६ आहे.**

आज दिनांक २४/०४/२०२६ रोजी माझे महीने व न्यायालयाने शिक्क्याने दिले.

**(विधीज्ञ तळेकर के. व्ही.)**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर बीड**

शिक्का | **(स्वाक्षरीत) क. लिपीक**



**जाहीर प्रगटन**

**मा. श्रीमती वंदना व्ही. जोशी, दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ६२८/२०२६**

**सिध्देश्वर पि.मदन मोरे व इतर वि. निरंक**

अर्जदार – **१. सिध्देश्वर पि.मदन मोरे, वय– ४६ वर्षे, धंदा–शेती, रा.गुंधा ता.जि.बीड. २. सचिन पि. मदन मोरे, वय– ४४ वर्षे, धंदा–शेती, रा. सदर. ३. सारिका भ्र. संतोष कौचट, वय ४० वर्षे, धंदा–घरकाम, रा. १८१८ बांदल आळी, आयसीआयसीआय बँकेच्या मागे, रांजणगाव गणपती, पुणे ता. जि. पुणे. ४. चंद्रकला भ्र. मदन मोरे, वय–६८वर्षे, धंदा–घरकाम, रा. गुंधा ता.जि.बीड** विरुध्द

गैरअर्जदार– निरंक

प्रकरण:– भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत मदन बाजीराव मोरे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत मदन बाजीराव मोरे हे दिनांक २८/१२/२०२५ रोजी राहते घरी मौजे गुंधा ता. जि. बीड मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ व २ हे मयताचे मुले असुन अर्जदार क. ३ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. तसेच अर्जदार क. ४ ही मयताची पत्नी आहे. अर्जदारांशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहु मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु, मयत नामे मयत मदन बाजीराव मोरे रा. गुंधा ता.जि. बीड यांचे अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस म्हणुन घोषीत करुन अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**पुढील तारीख २३/०६/२०२६.** आज दिनांक २०/०४/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

**(ॲड. एम. डी. धांडे)**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर बीड**

शिक्का | **(स्वाक्षरीत) क. लिपीक**



**जाहीर प्रगटन**

अर्जदार **प्रदिप हनुमंतराव पिंपळे रा. टाकळगाव ता.गेवराई जि. बीड** यांचा अर्ज दिनांक २९.०४.२०२६ उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, प्रकरणात संदर्भ क्र. ०२ नुसार अर्जदार प्रदिप हनुमंतराव पिंपळे रा. टाकळगाव ता.गेवराई जि. बीड यांनी अर्ज देऊन नमूद केले की, यांचे वडील नामे हनुमंतराव उद्धवराव पिंपळे यांचा मृत्य दिनांक ०९.१२.२०१० रोजी स्वामी विवेकानंद सरकारी दवाखाना अंबाजोगाई जिल्हा बीड येथे झाला असून संबंधिताची नोंद करावयाची राहून गेल्याने प्रकरणात मृत्यू नोंद आदेश मिळणे बाबत या कार्यालयास संदर्भीय अर्ज विनंती करण्यात आलेला आहे. करीता उक्त अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक मृत्यू नोंद २५२६/ ईआं/११९/१९/प्र.क्र.३२/कृ.क नवीन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५ नुसार प्रकरणात पो.स्टे गेवराई यांना कळविण्यात येते की, अर्जदारास स्थानिक मृत्यू नोंदणी पुरावा व रहिवासी तपास करून पोलीस निरीक्षक यांनी चौकशी अहवाल सादर करावा, तसेच ग्राम महसूल अधिकारी टाकळगाव यांनी अर्जदाराचे स्थानिक रहिवासीबाबत स्थानिक चौकशी/पंचनामा करून वस्तुस्थिती दर्शक अहवाल सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.

उत्तर: अर्जदार प्रदिप हनुमंतराव पिंपळे रा. टाकळगाव ता.गेवराई जि. बीड यांना प्रत देऊन कळविण्यात येते की, आपल्या वडिलांचे मृत्यू बाबत स्थानिक वृत्तपत्रामध्ये स्वतःच्या खर्चाने जाहीर प्रगटन प्रसिद्ध करणे व वृत्तपत्राची मूळ प्रत या कार्यालयास सादर करावी. तसेच आपण अर्जासह स्वयंघोषणापत्र सादर करताना ०२ स्थानिक प्रतिष्ठित नागरिक, पोलीस पाटील, विशेष कार्यकारी अधिकारी, तंटामुक्ती अध्यक्ष, राजपत्रित अधिकारी यांची साक्षीदार म्हणून स्वाक्षरी घेण्यात यावी.

**आदेशावरून (स्वाक्षरीत) तालुका दंडाधिकारी, गेवराई**

शिक्का

### आष्टीत आरोग्य क्रांती ; उपजिल्हा रुग्णालय, ट्रामा, डायलिसिस, सोनोग्राफी सेवा उपलब्ध आता मात्र पाटोद्याला उपजिल्हा रुग्णालय द्यावा गणेश शेवाळे यांची मागणी



**पाटोदा (प्रतिनिधी)** – आष्टी तालुक्यात आरोग्य सुविधांचा झपाट्याने विकास होत असून उपजिल्हा रुग्णालय, ट्रामा सेंटर तसेच डायलिसिस व सोनोग्राफीसारख्या अत्यावश्यक सेवा सुरू झाल्याने नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. ▸▸ उर्वरित पान २ वर

# परळी नगर परिषदेच्या अग्निशमन दलाचा बोजवारा !




### ● 'रेझिंग' मॉल जळून खाक ; ५०० मीटरवरूनही गाडी ४० मिनिटे उशिरा
### ● नगरसेवक नितीन बागवाले आक्रमक ; चौकशी व कारवाईची मागणी, आंदोलनाचा इशारा

**परळी वै. । प्रतिनिधी**

परळी शहरातील राणी लक्ष्मीबाई टॉवर परिसरात बुधवारी (दि. २९) दुपारी लागलेल्या भीषण आगीत 'रेझिंग' या कपड्यांच्या मॉलचा अक्षरशः राखरांगोळी झाला. धक्कादायक बाब म्हणजे, घटनास्थळापासून अवघ्या ५०० मीटर अंतरावर असलेल्या नगर परिषदेच्या अग्निशमन केंद्राची गाडी तब्बल ४० ते ५० मिनिटे उशिराने पोहोचली. या गंभीर हलगर्जीपणामुळे व्यापाऱ्याचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून, नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

राणी लक्ष्मीबाई टॉवर चौकातील गजबजलेल्या 'रेजिन लेडीज वेअर' या दालनात अचानक आग लागल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. नागरिकांनी तातडीने अग्निशमन विभागाला कळवले, मात्र प्रतिसादात झालेल्या विलंबामुळे आगीने रौद्ररूप धारण केले. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे पाहून अखेर थर्मल पॉवर स्टेशनच्या अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. त्यांच्या तत्परतेमुळे आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले, पण तोपर्यंत मॉलमधील मोठ्या प्रमाणात माल जळून खाक झाला होता. या निष्क्रियतेवर संतप्त प्रतिक्रिया देताना राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे गटनेते तथा नगरसेवक नितीन बागवाले यांनी प्रशासनावर जोरदार हल्ला चढवला.

आपत्कालीन सेवा नागरिकांच्या सुरक्षेसाठी असते, मात्र परळी नगर परिषदेची यंत्रणा पूर्णपणे कोलमडली आहे. ५०० मीटर अंतरावर असताना अग्निशमन ▸▸ उर्वरित पान २ वर

# पाथर्डी पोलीस ठाण्यातील दोन पोलीस लाचलुचपतच्या जाळ्यात



**पाथर्डी । प्रतिनिधी**

पाथर्डी पोलीस ठाण्यातील दोन पोलीस कर्मचार्यांना नाशिक येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने लाच घेताना रंगेहात पकडल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या कारवाईत एका पोलिसाला ताब्यात घेण्यात आले असून दुसरा कर्मचारी घटनास्थळावरून पसार होण्यात यशस्वी झाला आहे. या प्रकारामुळे पाथर्डी पोलीस ठाण्यात मोठी खळबळ उडाली आहे. प्राथमिक माहितीनुसार, तक्रारदाराच्या अपघातग्रस्त वाहनाची सुटका करून देण्यासाठी संबंधित पोलिसांनी पैशांची मागणी केली होती. याबाबत तक्रारदाराने नाशिक लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली होती. त्यानंतर सापळा रचून ही कारवाई करण्यात आली. बुधवारी दुपारी पाथर्डी पोलीस ठाण्यात तक्रारदाराकडून पैसे घेताना ही घटना घडली असून यामध्ये पोलीस हेडकॉन्स्टेबल व पोलीस कॉन्स्टेबल या कारवाईत दोन पोलीस कर्मचारी सापडले असून एक कर्मचारी कारणास्थळावरून पसार झाला आहे. एकाला एसीबीच्या पथकाने ताब्यात घेतले आहे.

# कर्जबाजारी शेतकऱ्याची चिंचवडगावात आत्महत्या

### सततची नापिकी आणि शेतमालाला भाव नसल्यामुळे झाला कर्जाचा डोंगर

**वडवणी । प्रतिनिधी**

शेतात सततची नापिकी आणि उत्पादित झालेल्या मालाला योग्य भाव मिळत नसल्यामुळे कर्जाचा डोंगर झालेला कसा फेडायाचा त्यातच शासनाकडून पिक विमा आणि कर्जमाफीला होणारा विलंब यामुळे वडवणी तालुक्यातील चिंचवडगाव येथील एका वयोवृद्ध शेतकऱ्याने आत्महत्या केल्याची घटना काल बुधवारी सकाळी घडली. उत्तम भानुदास तिडके वय ६२ असे शेतकऱ्याचे नाव असून सदर शेतकऱ्याला शासनाने तात्काळ ▸▸ उर्वरित पान २ वर



**खिशात निघाले पाच रुपये**

**मयत उत्तम तिडके यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या कपड्यांची पाहणी केली असता त्यांच्या खिशात केवळ पाच रुपये सापडले. यावरून ते किती अडचणीत होते याचा अंदाज**

## परळीत सोमवारी मांस विक्री बंदीचा ऐतिहासिक निर्णय ; सर्वानुमते ठराव मंजूर



**परळी वै. । प्रतिनिधी**

परळी नगरपरिषदेच्या दि. ३० एप्रिल २०२६ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत प्रत्येक सोमवारी मांस विक्री बंदी या महत्त्वपूर्ण विषयास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. परळी हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक पवित्र तीर्थक्षेत्र असल्यामुळे नागरिक व भाविकांच्या भावना लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला.

यापूर्वी दि. २० एप्रिल २०२६ रोजी झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत हा विषय समाविष्ट करण्यात आला होता. त्यानंतर आजच्या सर्वसाधारण सभेत हा विषय मांडून अंतिम मंजुरी देण्यात आली. परळी नगरपरिषदेच्या थेट लोकनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या नेतृत्वाखाली हा निर्णय घेण्यात आला असून, त्यांच्या विकास पर्व २.० या संकल्पनेतून जनभावना, धार्मिक संवेदनशीलता आणि स्थानिक गरजा यांचा समतोल साधणारे प्रशासन दिसून आले. शहराच्या सर्वांगीण विकासाबरोबरच परळीच्या पवित्रतेचा सन्मान राखण्याचा त्यांचा ▸▸ उर्वरित पान २ वर

# अमरसिंह पंडित हेच मुस्लिम बांधवांसाठी सर्व सोयींनीयुक्त शादीखाना उभारणार: जे के बाबू

### ● मुस्लिम समाजाने अपप्रचाराला बळी पडू नये

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्याचे लोकप्रिय नेते माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी मुस्लिम समाजाला सातत्याने न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे. मुस्लिम समाजाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी ते कायम पुढे असतात. गेवराई शहरातील मुस्लिम बांधवांचा शादीखान्याचा प्रश्न अनेक दिवसांपासून प्रलंबित होता, याची दखल घेऊन माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार विजयसिंह पंडित यांनी भव्य दिव्य शादीखखना उभारण्यासाठी भरीव निधी मंजूर करून आणला. तांत्रिक अडचणीमुळे काम होण्यास वेळ लागत असल्यामुळे काही लोक अपप्रचार करत आहेत. मुस्लिम समाजाने त्यांच्या अपप्रचाराला बळी पडू नये. माजी आमदार अमरसिंह पंडित हेच मुस्लिम समाजासाठी भव्य दिव्य शादीखाना उभारणारच असे प्रतिपादन ज्येष्ठ कार्यकर्ते जेके बाबुभाई यांनी केले.

प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात जेके पुढे ▸▸ उर्वरित पान २ वर



## सुशी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

### डॉ.बाबासाहेबांच्या विचारांचा प्रचार–प्रसार करण्याचा तरुणांकडून संकल्प



**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील सुशी येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिबा फुले यांची ▸▸ उर्वरित पान २ वर

## राज्यात ३०० कोटी वृक्षलागवडीच्या हरित आयोगाच्या नियामक मंडळावर एका दिवसात ७० लाख वृक्षलागवडीचा 'रेकॉर्ड' गाजवणाऱ्या बीड प्रशासनाला संधी द्या : डॉ. ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

राज्यात ३०० कोटी वृक्षलागवडीच्या महत्त्वाकांक्षी उपक्रमासाठी स्थापन करण्यात आलेल्या हरित महाराष्ट्र आयोगाच्या नियामक मंडळावर बीड जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांना स्थान द्यावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (महाराष्ट्र राज्य) डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी केली आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री बीड सुनेत्रा पवार, वनमंत्री गणेश नाईक आणि पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांना लेखी निवेदन देण्यात आले आहे. राज्य सरकारने २०४७ पर्यंत ३०० कोटी वृक्षलागवडीचा संकल्प जाहीर केला असून त्याची अंमलबजावणी हरित महाराष्ट्र आयोगामार्फत केली जाणार आहे.



आयोगाच्या नियामक मंडळात मुख्यमंत्री अध्यक्ष, उपमुख्यमंत्री उपाध्यक्ष तसेच वन, पर्यावरण, कृषी आणि रोजगार हमी योजना मंत्री यांचा समावेश असणार आहे. या उपक्रमासाठी सुमारे २७ लाख हेक्टर जमिनीची आवश्यकता असल्याचेही सरकारने स्पष्ट केले आहे. दरम्यान, बीड जिल्हा प्रशासनाने यापूर्वी एका दिवसात ३० लाख, ६३ लाख आणि तब्बल ७० लाख वृक्षलागवडीचे 'रेकॉर्ड' प्रस्थापित केल्याचा दावा करण्यात आला आहे. या कामगिरीची इंडियन बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद ▸▸ उर्वरित पान २ वर

## दिंद्रुड येथे फुले-आंबेडकर जन्मोत्सव उत्साहात साजरा



**दिंद्रुड । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथे फुले–आंबेडकर जन्मोत्सव नुकताच साजरा करण्यात आला, यानिमित्त सुप्रसिद्ध गायक संतोष जोंधळे यांच्या संगीत मैफिलीत माय मले लय लय शिकायचं बाबासाहेबांवाणी साहेब बनायचं या उत्सुर्त गीतावर अबाल वृद्ध थिरकतांना पहायला मिळाले.

मंगळवारी आयोजित संगीत मैफिलीत सुप्रसिद्ध गायक संतोष जोंधळे यांच्या बहारदार गीतांनी प्रेक्षकांना ▸▸ उर्वरित पान २ वर

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, रामबाग नवीन जागेत स्थलांतरित

**वडवणी । प्रतिनिधी**

विद्यार्थी, पालक, शिक्षण प्रेमी यांच्यासाठी,अत्यंत आनंदाची बाब आहे की,जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,रामबाग वडवणी ही आता नूतन सुसज्ज इमारतीमध्ये स्थलांतरित होत आहे. या प्रवासात शाळेच्या प्रगतीसाठी आणि विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी अनेक माजी विद्यार्थी,प्रतिष्ठित नागरिक, शिक्षणप्रेमी आणि युवा उद्योजकांनी आपले मोलाचे योगदान दिले आहे. शाळा स्मार्ट झाली तर नक्कीच उज्वल भवितव्य




असणारी पिढी तयार होईल म्हणून आपण दिलेल्या या मदतीबद्दल शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थ आपले ऋणी आहोत.

आमचे प्रेरणास्थान देणगीदार पुढील दानशूर व्यक्तीनी देणगी दिली आहे त्यांची नावे श्री.नागेशभाऊ डिगे नगरसेवक तसेच १) श्री.विनोदशेट असलकर इन्व्हर्टर व बॅटरी २)श्री.भाई उजगरे सामाजिक नेते ११ सीलिंग फॅन ३) श्री.अजय भैरट (युवा उद्योजक) ४ सीसीटीव्ही कॅमेरे ४) श्री.दत्तात्रय टिपरे (सहशिक्षक व माजी विद्यार्थी) १५ खुर्च्या ५) सौ.सीमाताई रामदास आठवले (अध्यक्ष, रिपाई महाराष्ट्र) २००० लिटर पाणी टाकी (०१) ६) श्री.महादेव दादा उजगरे (तालुकाध्यक्ष, रिपाई वडवणी) २००० लिटर पाणी टाकी (०१) ७) श्री.प्रकाश कुरकुटे सर (माजी विद्यार्थी) व्हाईट बोर्ड (०१) ८) श्री. सुदाम खटावकर सर (माजी विद्यार्थी) व्हाईट बोर्ड (०१) ९) श्री. भिवराज कोकणे सर (माजी विद्यार्थी) व्हाईट बोर्ड (०१) १०) ▸▸ उर्वरित पान २ वर